# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** विधान भवन, नागपूर येथिल वास्तुच्या विस्तारीकरणांतर्गत
**{ स्थावर विभाग }** नवीन इमारतीच्या बांधकामाकरिता नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची मौजा-सिताबर्डी न.भु.क्र. १८५५/१, आराजी २०३३.०० चौ.मी. (१४८९.०० चौ.मी. तसेच ५४४.०० चौ.मी) त्रिकोणी आकाराची जागा महाराष्ट्र विधानमंडळास हस्तांतरीत करणेचा प्रश्न विचारात घेणे.

मौजा-सिताबर्डी येथिल न.भु.क्र. १८५५/१, क्षेत्रफळ २०३३.०० चौ.मी. (१४८९.०० चौ.मी + ५४४.०० चौ.मी) नागपुर महानगरपालिकेच्या मालकीची असून उक्त जागा विधान भवन इमारत व झिरो माईल परीसरा जवळ आहे.

उक्त संपूर्ण जागेची आवश्यकता विधान भवन नागपूर परीसराचा विस्तारीकरण करणेच्या प्रकल्पाकरीता असल्याचे महाराष्ट्र विधानमंडळ, विधान भवन नागपूर कार्यालयाचे पत्र क्र. १२९/म.वि.स/नागपूर दि. ०५.०५.२०२५ च्या पत्रान्वये नागपुर महानगरपालिकेला जागेची मागणी करण्यात आलेली आहे.

मौजा-सिताबर्डी येथिल न.भु.क्र. १८५५/१, जागा आखिव पत्रिकेनुसार क्षेत्रफळ २०३३.०० चौ.मी असलेली नागपूर महानगरपालिकेच्या नावे दि. ०१.१०.२००८ च्या नोंदणीनुसार १४८९.०० चौ.मी. व दि. ३१.०७.२००९ च्या नोंदणीनुसार ५४४.०० चौ.मी. अशी एकुण २०३३.०० चौ.मी. क्षेत्रफळाची जागा नागपूर महानगरपालिकेच्या नावे दर्ज आहे.

प्रत्यक्ष खाजगी मोजमापानुसार उक्त जागा २०५५.३० चौ.मी. असून त्यापैकी विधान भवनाकरीता ७८६.०० चौ.मी. जागा व त्याला लागून असलेल्या १५.०० मी. रुंद रस्त्याचे १२६९.०० चौ.मी. जागा विधान भवनासाठी घेण्याचे MSIDC कार्यालयाचे जा.क्र. अ.अ.(नागपूर)/विधानभवन/२०२५/२३१ दि. १६.०९.२०२५ च्या पत्रान्वये प्रस्तावीत आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची २०३३.०० चौ.मी. क्षेत्रफळाची जागा विधान भवन नागपूर इमारीतीच्या विस्तारीकरणास उपलब्ध करून दिल्यास त्या मोबदल्यात शासकीय मुद्रणालयाच्या जागेतील ७९७.०० चौ.मी व १४१.९१ चौ.मी जागा झिरो माईल प्रकल्पाच्या वाहनतळा करीता अशी एकुण ९३८.९१ चौ.मी. जागा मिळणार असल्याचे व उर्वरीत जागा १०९४.०९ चौ.मी. (२०३३.०० - ९३८.९१) जागेच्या मोबदल्याबाबत स्थावर विभागाने कार्यवाही करणेचे मुख्य अभियंता महानगरपालिका कार्यालयांनी सुचित  केलेले आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची उक्त जागा मंजुर विकास अराखड्यानुसार वाहनतळाकरीता राखिव असल्याने उक्त जागेलगत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम द्वारा झिरो माईल विकासाच्या प्रकल्प राबविला जात असल्याने उक्त जागेचा वापर झिरो माईलच्या प्रकल्पाचे वाहनतळा करीता होणार होता. परंतु मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, महानगरपालिका कार्यालयाद्वारा प्रस्तावित केल्यानुसार वाहनतळा करीता आरक्षित असलेली महानगरपालिकेच्या मालकिची २०३३.०० चौ.मी. जागा विधान भवन नागपूरच्या विस्तारीकरणाकरीता उपलब्ध करून दिल्यास त्या मोबदल्यात शासकीय मुद्रणालय परीसरातील

७९७.०० चौ.मी. व १४१.९१ चौ.मी अशी एकुण ९३८.९१ चौ.मी. क्षेत्रफळाची पर्यायी जागा झिरो माईलचा विकास प्रकल्पाकरीता उपलब्ध होत आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची २०३३.०० चौ.मी जागेच्या मोबदल्यात मिळणारी ९३८.९१ चौ.मी. जागा महाराष्ट्र विधान मंडळाकडुन स्विकारून व १०९४.०९ चौ.मी. क्षेत्रफळाच्या जागेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ७ चे कलम ७९(ड) च्या तरतुदीनुसार आवश्यक आर्थिक मोबदला प्राप्त करुन, महानगरपालिकेच्या मालकीची २०३३.०० चौ.मी. क्षेत्रफळाची जागा महाराष्ट्र विधानमंडळास, विधानभवन नागपूरचे विस्तारीकरण प्रकल्पास देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९(क) च्या तरतुदी अंतर्गत कार्यवाही करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 69/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 13/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (मालमत्ता), स्थावर विभागयांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार विधान भवन, नागपूर येथिल वास्तुच्या विस्तारीकरणांतर्गत नवीन इमारतीच्या बांधकामाकरिता नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची मौजा-सिताबर्डी न.भु.क्र. १८५५/१, आराजी २०३३.०० चौ.मी. (१४८९.०० चौ.मी. तसेच ५४४.०० चौ.मी) त्रिकोणी आकाराची जागा महाराष्ट्र विधानमंडळास हस्तांतरीत करणेचा प्रश्न विचारात घेणे.

मौजा-सिताबर्डी येथिल न.भु.क्र. १८५५/१, क्षेत्रफळ २०३३.०० चौ.मी. (१४८९.०० चौ.मी + ५४४.०० चौ.मी) नागपुर महानगरपालिकेच्या मालकीची असून उक्त जागा विधान भवन इमारत व झिरो माईल परीसरा जवळ आहे.

उक्त संपूर्ण जागेची आवश्यकता विधान भवन नागपूर परीसराचा विस्तारीकरण करणेच्या प्रकल्पाकरीता असल्याचे महाराष्ट्र विधानमंडळ, विधान भवन नागपूर कार्यालयाचे पत्र क्र. १२९/म.वि.स/नागपूर दि. ०५.०५.२०२५ च्या पत्रान्वये नागपुर महानगरपालिकेला जागेची मागणी करण्यात आलेली आहे.

मौजा-सिताबर्डी येथिल न.भु.क्र. १८५५/१, जागा आखिव पत्रिकेनुसार क्षेत्रफळ २०३३.०० चौ.मी असलेली नागपूर महानगरपालिकेच्या नावे दि. ०१.१०.२००८ च्या नोंदणीनुसार १४८९.०० चौ.मी. व दि. ३१.०७.२००९ च्या नोंदणीनुसार ५४४.०० चौ.मी. अशी एकुण २०३३.०० चौ.मी. क्षेत्रफळाची जागा नागपूर महानगरपालिकेच्या नावे दर्ज आहे.

प्रत्यक्ष खाजगी मोजमापानुसार उक्त जागा २०५५.३० चौ.मी. असून त्यापैकी विधान भवनाकरीता ७८६.०० चौ.मी. जागा व त्याला लागून असलेल्या १५.०० मी. रुंद रस्त्याचे १२६९.०० चौ.मी. जागा विधान भवनासाठी घेण्याचे MSIDC कार्यालयाचे जा.क्र. अ.अ.(नागपूर)/विधानभवन/२०२५/२३१ दि. १६.०९.२०२५ च्या पत्रान्वये प्रस्तावीत आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची २०३३.०० चौ.मी. क्षेत्रफळाची जागा विधान भवन नागपूर इमारीतीच्या विस्तारीकरणास उपलब्ध करून दिल्यास त्या मोबदल्यात शासकीय मुद्रणालयाच्या जागेतील ७९७.०० चौ.मी व १४१.९१ चौ.मी जागा झिरो माईल प्रकल्पाच्या वाहनतळा करीता अशी एकुण ९३८.९१ चौ.मी. जागा मिळणार असल्याचे व उर्वरीत जागा १०९४.०९ चौ.मी. (२०३३.०० - ९३८.९१) जागेच्या मोबदल्याबाबत स्थावर विभागाने कार्यवाही करणेचे मुख्य अभियंता महानगरपालिका कार्यालयांनी सुचित केलेले आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची उक्त जागा मंजुर विकास अराखड्यानुसार वाहनतळाकरीता राखिव असल्याने उक्त जागेलगत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम द्वारा झिरो माईल विकासाच्या प्रकल्प राबविला जात असल्याने उक्त जागेचा वापर झिरो माईलच्या प्रकल्पाचे वाहनतळा करीता होणार होता. परंतु मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, महानगरपालिका कार्यालयाद्वारा प्रस्तावित केल्यानुसार वाहनतळा करीता आरक्षित असलेली महानगरपालिकेच्या मालकिची २०३३.०० चौ.मी. जागा विधान भवन नागपूरच्या विस्तारीकरणाकरीता उपलब्ध करून दिल्यास त्या मोबदल्यात शासकीय मुद्रणालय परीसरातील ७९७.०० चौ.मी. व १४१.९१ चौ.मी अशी एकुण ९३८.९१ चौ.मी. क्षेत्रफळाची पर्यायी जागा झिरो माईलचा विकास प्रकल्पाकरीता उपलब्ध होत आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची २०३३.०० चौ.मी जागेच्या मोबदल्यात मिळणारी ९३८.९१ चौ.मी. जागा महाराष्ट्र विधान मंडळाकडुन स्विकारून व १०९४.०९ चौ.मी. क्षेत्रफळाच्या जागेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ७ चे कलम ७९(ड) च्या तरतुदीनुसार आवश्यक आर्थिक मोबदला प्राप्त करुन, महानगरपालिकेच्या मालकीची २०३३.०० चौ.मी. क्षेत्रफळाची जागा महाराष्ट्र विधानमंडळास, विधानभवन नागपूरचे विस्तारीकरण प्रकल्पास देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९(क) च्या तरतुदी अंतर्गत कार्यवाही करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.